*मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग,नाशिक*
*(२०/०२/२००९ अखेर)*

# नागरिकांची सनद

**(महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम -८)**

BC CELL

## १) प्रस्तावना :-

शासन सा.प्र.विभागाकडील निर्णय क्रं. बीसीसी/१०८५/२९८९/१६-ब दि. १३/०८/१९८६ अन्वये विभागीय स्तरावर सामान्य प्रशासन विभागाचे अधिपत्याखाली विभागीय आयुक्त कार्यालयात स्वतंत्र मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. हया मागासवर्ग कक्षाचे नियंत्रण अधिकारी विभागीय आयुक्त आहेत. मागासवर्ग कक्षामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक नागरिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी हा कक्ष बांधिल राहील.

## २) मागासवर्ग कक्षाची रचना :-

म.विभागीय आयुक्त यांचे अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या कक्षाचे प्रमुख सहाय्यक आयुक्त (मावक) असून त्यांचे अधिपत्याखाली, नायब तहसिलदार-१, अव्वल कारकून-२, लिपीक टंकलेखक-२, शिपाई-१ असे अधिकारी व कर्मचारी काम करतात. मागासवर्ग कक्षाचे कार्यक्षेत्र विभागीय असून विभागातील नाशिक, अहमदनगर,धुळे,नंदुरबार,जळगाव या ५ जिल्हयांसाठी शासकीय / निमशासकीय कार्यालये, शिक्षणसंस्था, मंडळे-महामंडळे, सह. संस्था यांचे आस्थापनेवरील वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांचे सरळसेवा व पदोन्नती संबंधातील आरक्षणाची निश्चिती करुन देण्यात येते. त्याचप्रमाणे, मागासवर्गीय वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांचे सेवा विषयक तक्रारींची दखल घेवून त्यांच्या तक्रारींचे शासनाचे नियमास अनुसरुन निराकरण करुन देण्यात येते. शाखेमध्ये एकूण चार संकलन असून त्यांचेकडे शाखेची संबंधीत कामे विभागून देण्यात आलेली आहेत. शाखेत काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांना जी कामे व जबाबदाऱ्या दिलेल्या आहेत त्यांचे विश्लेषण समवेतच्या परिशिष्ट १ मध्ये नमूद केले आहे.

## ३) कार्यपूर्तीचे वेळापत्रक :-

मागासवर्ग कक्षामार्फत पूरविण्यात येणाऱ्या सेवांच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक परिशिष्ट २ येथे सादर करण्यात आले आहे.

**४)कायदा/नियम/शासन निर्णय :-**

मागासवर्ग कक्षाचे कामकाज ज्या शासन निर्णय, परिपत्रके व मार्गदर्शन पत्रांचा आधार घेवून करण्यात येत असते ते महत्त्वाचे निर्णय व आदेश हया कार्यालयाचे मागासवर्ग कक्षाचे nashikasstcom_bccell@maharashtra.gov.in हया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असून, अशा महत्त्वाच्या शासन निर्णयांचे विश्लेषण तथा यादी, गुणवत्ता विकास प्रणाली अंतर्गत तयार करण्यात आलेल्या प्रक्रिया पुस्तिकेत त्या त्या विषयाचे अंतर्गत नमूद केलेले आहेत. तसेच अशा महत्त्वाच्या शासन निर्णय व परिवत्रकांची स्वतंत्र अशी स्थायी आदेशाची संचिका शाखेने तयार केली आहे.

**५) अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण :-**

कार्यपुर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांत त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील. याउपरही नागरिकांचे समाधान न झाल्यास म. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांचेकडे याबाबत त्यांना तक्रार करता येईल.

गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने तथा ई मेलद्वारेही मांडता येतील.

**ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा /सिंहावलोकन :-**

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा मागासवर्ग कक्षाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनूसार बदल करण्यात येईल.

**क)जनसामान्यांकडून सूचना :-**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्मानीय नागरिकांच्या बहुमूल्य सुचनांच्या गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. त्याचप्रमाणे मावक शाखेच्या संबंधीत उपभोक्त्यांकडून शाखेच्या कामाचे अभिप्राय घेतले जातात.कामाच्या सुधारणेसंबंधी काही सूचना आल्यास त्याप्रमाणे आवश्यक ते बदल व सुधारणा करण्याची तजविज शाखेने ठेवली आहे.

**६) नागरिकांच्या सनदेची अंमलबजाणी :-**

मागासवर्ग कक्ष, नागरिकांच्या या सनदेची अंमलबजाणी दि. ०१ जानेवारी, २००७ पासून करण्यास कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिद्धी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया /अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

मागासवर्ग कक्ष, आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरवितांना नागरिकांना सौजन्यपूर्वक वागणूक देण्याची जबाबदारी कक्षातील प्रत्येक अधिकारी / कर्मचाऱ्यांची राहील.

*सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)*
*नाशिक विभाग नाशिक*

BC CELL

*मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग,नाशिक*

*(२०/०२/२००९ अखेर)*

# नागरिकांची सनद

**(महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम -८)**

**परिशिष्ट २ कार्यपूर्तीचे वेळापत्रात बदल :-**

**उपरोक्त अधिनियमाद्वारे मागासवर्ग कक्षाकडून पुरविल्या जाणाऱ्या सेवेअंतर्गत विभागातील वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक तक्रार प्रकरणांवर कार्यवाही करण्याचा कालावधी ४ दिवसांचा नमूद केला होता. त्यामध्ये दिनांक ०१/०४/२००८ पासून बदल करण्यात आलेला असून कार्यवाही करण्याचा कालावधी ४ दिवसांऐवजी ४५ दिवस असा सुधारित करण्यात आलेला आहे.**

**सोबत :- दुरुस्त परिशिष्ट २**

*सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)*
*नाशिक विभाग नाशिक*

BCELL